दैनिक
बहुरंगी वार्ता
रविवार ५ जानेवारी २०२५

# वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो- ज्योतीताई शेरे





**प्रतिनिधी, किनवट**

**बळीराम** पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किनवट येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानांतर्गत वाचन कौशल्यावर मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बेंबरेकर हे होते तर प्रमुख मार्गदर्शक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विचार मंचाच्या सचिव तथा महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय गोकुंदा च्या सहशिक्षिका होत्या. त्यांनी आपल्या भाषणात बोलतांना सांगितले की विद्यार्थ्यांनी वाचनाला छंद म्हणून जोपासावे वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

या प्रसंगी मंचावर मुनेश्वर मॅडम उप प्राचार्य पंजाब शेरे पर्यवेक्षक प्रा. विजय खूपसे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. शुभांगी दिवे यांनी केले.

प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विचार मंचाच्या सचिव ज्योतीताई शेरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्यावर सखोल मार्गदर्शन केले. सावित्रीबाईच्या विचार व कार्यांचे वाचन करून ते आत्मसात करणे व त्याला आचरणात आनावे असा मोलाचा संदेश दिला. त्याच बरोबर वाचन हे विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनवते वाचन केलेले पुस्तक हे अवलोकन करणे व त्याचे समीक्षण करून वाचन- -लेखन व संवाद कौशल्य विकसित करणे काळाची गरज बनली आहे. असे बोलतांना म्हणाल्या प्रसंगी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. शेषराव माने यांनी केले तर प्रमुख उपस्थितांचे आभार प्रा. डी.टी.चाटे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

दैनिक विष्णुपूरी एक्सप्रेस
दि.10 जानेवारी 2025 शुक्रवार

# शेतकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे -महेंद्र नरवाडे




**किनवट/प्रतिनिधी**

आपल्या परिसरातील उज्वल आशा संस्कृतीला नवलेखकानी शब्दबद्ध करावे शेतामध्ये राब-राब राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे. जगणं आणि व्यवहार हे साहित्यातून मांडून सशक्त साहित्य निर्मिती करावे असे मत बळीराम पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने लेखक - वाचक संवाद या अभिनव उपक्रमामध्ये प्रसिद्ध कवी महेंद्र नरवाडे यांनी केले. प्रारंभी थोर समाज सुधारक स्मृतीशेष बळीराम पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे प्रसिद्ध कवी रामस्वरूप मडावी, प्रा.डॉ.आनंद भालेराव विचार मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना महेंद्र नरवाडे म्हणाले आपल्या परिसरातील विविध कला संस्कृती लेखक आणि कवी यांचा सुद्धा अभ्यास करावा आपल्या परिसरातील वंचिताचे दुःख हे साहित्यातून मांडावे असे सांगून स्वरचित कविता सादर करून मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी लेखक म्हणून आदिवासी उज्वल संस्कृतीचा ठेवा हे आपण जतन करून ठेवला पाहिजे मातीमध्ये रुजलेले बियाणे जसे आनंदाने डोलते तसे विद्यार्थ्यांनी साहित्य नवनिर्मिती करून साहित्यातून आनंद निर्माणव्हावा असे रामस्वरूप मडावी यांनी सांगितले.कार्यक्रमाचे

प्रास्ताविक डॉ पंजाब शेरे यांनी केले अध्यक्षीय समारोप डॉ आनंद भालेराव यांनी केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राशी व कार्यक्रमाधिकारी प्रा डी टी चाटे डॉ शुभांगी दिवे, प्रा मंदाकिनी राठोड डॉ रत्नाकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा शेषराव माने यांनी केले तर उपस्थित आमचे आभार डॉ. शुभांगीदिवे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner

हिंगोली,परभणी,नांदेड,बीड जिल्ह्यातून स्वतंत्रपणे प्रकाशित होणारे विभागीय पातळीवरील दैनिक

# गाववाला

संस्थापक संपादक : उत्तमराव दगडू

R.N.I.No. MAH MAR/2013/49618 gmail: gaonwala@rediffmail.com, gaonwaladaily@gmail.com

६ पाने

# शेतकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे-महेंद्र नरवाडे




किनवट/दुर्गादास राठोड

आपल्या परिसरातील उज्वल आशा संस्कृतीला नवलेखकानी शब्दबद्ध करावे शेतामध्ये राब-राब राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे. जगणं आणि व्यवहार हे साहित्यातून मांडून सशक्त साहित्य निर्मिती करावे असे मत बळीराम पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने लेखक - वाचक संवाद या अभिनव उपक्रमामध्ये प्रसिद्ध कवी महेंद्र नरवाडे यांनी केले. प्रारंभी थोर समाज सुधारक स्मृतीशेष बळीराम पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. उपप्राचार्य डॉ. पंजाब शेरे प्रसिद्ध कवी रामस्वरूप मडावी, प्रा.डॉ.आनंद भालेराव विचार मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना महेंद्र नरवाडे म्हणाले आपल्या परिसरातील विविध कला संस्कृती लेखक आणि कवी यांचा सुद्धा अभ्यास करावा आपल्या परिसरातील वंचिताचे दुःख हे साहित्यातून मांडावे असे सांगून स्वरचित कविता सादर करून मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी लेखक म्हणून आदिवासी उज्वल संस्कृतीचा ठेवा हे आपण जतन करून ठेवला पाहिजे मातीमध्ये रुजलेले बियाणे जसे आनंदाने डोलते तसे विद्यार्थ्यांनी साहित्य नवनिर्मिती करून साहित्यातून आनंद निर्माणव्हावा असे रामस्वरूप मडावी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ पंजाब शेरे यांनी केले अध्यक्षीय समारोप डॉ आनंद भालेराव यांनी केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राशी व कार्यक्रमाधिकारी प्रा डी टी चाटे डॉ शुभांगी दिवे, प्रा मंदाकिनी राठोड डॉ रत्नाकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा शेषराव माने यांनी केले तर उपस्थित आमचे आभार डॉ. शुभांगीदिवे यांनी मानले.


Scanned with OKEN Scanner

दैनिक सत्यप्रभा
https://epaper.esatyaprabha.com

# शेतकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे–महेंद्र नरवाडे

किनवट,दि.९(ता.प्र.)–आपल्या परिसरातील उज्वल आशा संस्कृतीला नवलेखकानी शब्दबद्ध करावे शेतामध्ये राब–राब राबणाऱ्या कष्टकऱ्यांचे जीवन साहित्यातून पुढे यावे. जगणं आणि व्यवहार हे साहित्यातून मांडून सशक्त साहित्य निर्मिती करावे असे मत बळीराम पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने लेखक – वाचक संवाद या अभिनव उपक्रमामध्ये प्रसिद्ध कवी महेंद्र नरवाडे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पंजाब शेरे यांनी केले अध्यक्षीय समारोप डॉ. आनंद भालेराव यांनी केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राशी व कार्यक्रमाधिकारी प्रा. डी. टी. चाटे, डॉ. शुभांगी दिवे, प्रा. मंदाकिनी राठोड, डॉ. रत्नाकर यांनी मेहनत घेतली.

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner